**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २६२०६०१, २६१०६०२, २६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२
तार : EDUTECH E-mail:- desk10@dte.org.in Web:- http://www.dte.org.in

क्रमांक १०/तंशिसं/२०११/२२१
दि. 21 मई MAY 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ अमरावती/ नागपूर/ औरंगाबाद.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर इत्यादी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियासंबंधी शपथपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.डिटीईअ-२०११/(८२/११)/ताशि-५, दिनांक ११ मे,२०११.

शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर इत्यादी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. वरील संदर्भित शासन निर्णयानुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी विना अनुदानित संस्थांना इच्छापत्र देणे आवश्यक आहे. तसेच वरील शासन निर्णयानुसार **"ज्या संस्था केंद्रिभूत प्रक्रियेमध्ये सहभागी होणार नाहीत त्या संस्थेतील विद्यार्थ्यांना शासनाच्या फी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळणार नाही"** ही बाब सर्व संस्थांच्या निदर्शनास आणावी.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व खाजगी विना अनुदानित संस्थांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होणार किंवा नाही याबाबतचे हमीपत्र दिनांक २५/५/२०११ पर्यंत विभागीय कार्यालयात सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. सदर शपथपत्रावर संस्थेचे अध्यक्ष/सचिव आणि संस्थेचे प्राचार्यांची शिक्क्यासह स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. सदरचे हमीपत्र आपण संकलीत करुन या कार्यालयाला दिनांक ३१ मे,२०११ पर्यंत खास दूताकरवी पाठविण्यात यावे. सोबत शपथपत्राचा नमुना जोडला आहे.

सोबत : शपथपत्राचा नमुना.

विवि / चौधरी

(सही)
( डॉ.सु.का.महाजन )
प्र. संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

जा.क्र. तंशि/विकापु/विवि/प्रथमवर्षप्रवेश/११/४०५१

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
४१२, ई शिवाजीनगर,
पुणे ४११ ०१६.
दिनांक :- २३/०५/२०११.
23 MAY 2011

प्रत :- प्राचार्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर व तत्सम पदविका अभ्यासक्रम राबविण्या-या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी प्रवेशप्रक्रियेमध्ये सहभागाविषयी शपथपत्र सादर करणेबाबत. सोबतच्या विहीत नमुन्यामध्ये दिनांक २५/०५/२०११ पर्यंत विभागीय कार्यालयास एक मूळ प्रत व एक छायाप्रत सादर करण्यांत यावे.

(सही) 23-5-11
प्र. सहसंचालकांकरिता,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

INSTITUTE CODE:-

## *UNDERTAKING*
## *From Diploma Institutes*

We the Chairman / Secretary of the Management / Trust namely ..........................................and Principal (Name of the Institute) do hereby submitting an undertaking for admission to the student in our Polytechnic/ Institute for the academic year 2011-12.

It is irrevocably agreed by and between the undersigned and the State Government of Maharashtra in the public interest to effect admissions for the academic year 2011-12 that the Institute shall participate in the Centralized Admission Process conducted by the State Government of Maharashtra.

The Directorate of Technical Education, Maharashtra State, Mumbai will conduct multiple Centralized Admission Rounds as per rules approved by Government of Maharashtra, Mumbai. The seats remaining vacant shall be filled in by respective institution at its level directly after completing the Centralized Admission Process.

The detailed rules and regulations for effecting admissions will be prepared and published by the Directorate of Technical Education, Maharashtra State, Mumbai.

The undersigned Institute hereby agrees and undertakes that the institute shall grant admission to the students, who have been offered admissions in the Centralized Admission Process conducted by the Directorate of Technical Education, Maharashtra State, Mumbai.

Chairman/ Secretary — Principal

(Name & Seal of the Institute) — (Name & Seal of the Institute)

---

N.B.: The above undertaking shall be submitted on Non-Judicial Stamp Paper of Rs. 100/- (Rs. One Hundred only) and duly Notarized. It should be signed by either Chairman/ Secretary of the Trust running the Institute and Principal of the Institute.

**शासकीय व अशासकीय अनुदनित/ विना-अनुदानित संस्थांमधील वर्ष २०११-१२ करिता एस.एस.सी व एच.एस.सी.नंतरच्या अभ्यासक्रमाच्या अभियात्रिकी/ तंत्रज्ञान औषधनिमाणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम प्रवेश अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश नियम**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.डिटीईअ-२०११/(८२/११)/ताशि-५,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३.**
**दिनांक ११ मे, २०११.**

**शासन निर्णय :-** संचालक, तंत्रशिक्षण सचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दि.२४ मार्च, २०११ च्या पत्रान्वये प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठीच्या प्रवेश नियमास शासनाची मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

२. सदर प्रस्तावामध्ये संचालक, तंत्रशिक्षण सचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रवेश नियमावलीमध्ये ज्या सुधारणा सुचविलेल्या आहेत. त्यामध्ये कैंद्रिय प्रवेश प्रक्रिया ( CAP ) सक्तीची ठेवण्यात आलेली होती. त्याऐवजी ऐच्छिक स्वरुपाची ठेवण्यांस शासनाची मान्यता असून फी प्रतिपूर्ती योजना पुढे चालू राहिल्यास ज्या संस्था कैंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये (CAP) सहभागी होणार नाही त्यांना फी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळणार नाही. या सुधारणासह प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

**( ज.म.अंबादे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. निवड नस्ती , तांशि-५.